नीला गार्डन
आवड यशाकडे नेणारी

Archana Bhatt, Sreeram V and Abdulla Habeeb

आपल्या आवडीचा पाठलाग करण्याचा दृढनिश्चय केल्यास उद्योजक म्हणून आश्चर्यकारक यश मिळू शकते. ही कहाणी आहे सुभद्रा कुमारी यांची, ज्यांनी त्यांच्या ऑर्किड उद्योगाला फुलण्यासाठी आणि भरभराटीसाठी जोपासले.



श्रीमती सुभद्रा कुमारी यांचे ऑर्किडवरील प्रेम आता नीला गार्डनमध्ये फुलले आहे.

केरळमधील वायनाडच्या शांत परिसरात वसलेल्या निला गार्डन या भरभराटीच्या उद्योगाच्या प्रनेत्या ६३ वर्षीय स्वप्नदर्शी सुभद्रा कुमारीला भेटुया. या उद्योगात ऑर्किड्सबद्दलची तिची आवड आणि खोलवर रुजलेले प्रेम आहे.

मूळचे पथ्नमथिट्टा येथील रहिवासी असलेले सुभद्रा यांचे कुटुंब १९७५ च्या सुमारास वायनाड जिल्ह्यात स्थायिक झाले. एसएसएलसी आणि टेलिकम्युनिकेशन आणि टंकलेखन या विषयात डिप्लोमा केल्यानंतर, सुभद्रा यांना लहानपणापासूनच वनस्पतींबद्दलचे आकर्षण निर्माण झाले. वनस्पतींबद्दल, विशेषतः फुलांच्या वनस्पतींबद्दलचा त्यांचा उत्साह पाहून, कुटुंबाने त्यांच्या वनस्पतिशास्त्रीय कार्यांना चालना देण्यासाठी विविध प्रदेशांमधून लागवड साहित्य मिळवून त्यांना पाठिंबा दिला.

सुलतान बाथेरी येथील फुलशेती उत्साही लोकांची संस्था असलेल्या कृषी बागायती सोसायटीची सदस्य म्हणून सुभद्राने नोंदणी केली. ही सोसायटी कटफ्लॉवर व्यवसायावर कृषी विभागाद्वारे चालवली जाते. संपूर्ण वायनाडमधील सदस्य या सोसायटी मध्ये होते. सुभद्राने २००३ मध्ये अँथुरियमवरील प्रशिक्षणाने तिच्या फुलशेती प्रवासाची सुरुवात केली. अँथुरियमच्या कापलेल्या फुलांचे संकलन, लागवड आणि प्रक्रिया यावर प्रशिक्षण देण्यात आले. त्यावेळी वायनाडमध्ये कृषी विपणन समिती नावाच्या सरकारी घाऊक बाजारपेठेद्वारे मार्केटिंग केले जात असे.

ती तिच्या वहिनीसोबत लोकल बसने शिकायला कशी जायची याची आठवण करून देते. बसभाड्यासाठी कमी पैसे असूनही, वनस्पतींवरील तिच्या कधीही न संपणाऱ्या प्रेमामुळे ती तिथे नियमित जात असे. एकेकाळी समाजातील तिचे अनेक सहकारी जे नंतर फुले व्यवस्थापित करण्यात आर्थिक अडचणींचा सामना करत होते तसेच वनस्पतींवर वन्यजीवांचे हल्ले होत होते त्यामुळे ते शिक्षण सोडून गेले, मात्र अनेक आव्हानांना तोंड देऊनही तिने शिक्षण सुरू ठेवले. अखेर २००८ मध्ये तिची आवड सुंदर ऑर्किड फुलांकडे जुळली.

एका भेटीदरम्यान, त्रिवेंद्रमच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तिला ऑर्किड लागवडीची कल्पना विषद केली. सुरुवातीला, तिने त्रिवेंद्रममधील एका खाजगी रोपवाटिकेतून लहान खरेदी करून सुरुवात केली जी अखेर तिच्या फुलशेतीच्या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा ठरली.

त्यावेळी, सर्वसाधारण समज होता की वायनाडच्या डोंगराळ प्रदेशातील हवामानात अनेक ऑर्किड जाती चांगल्या प्रकारे टिकू शकत नाहीत. परंतु, तरीही तिने त्यांचा पाठपुरावा केला आणि तिच्या घरी स्वतःचे ऑर्किड साम्राज्य निर्माण केले. तिची सुरुवातीची योजना स्वतःचा ऑर्किड संग्रह तयार करण्याची होती. वनस्पती मोठ्या प्रमाणात पसरू लागल्याने, तिने तिच्या संग्रहात असलेल्या ऑर्किडच्या विविध जातींचे मार्केटिंग करण्याकडे वळले. राज्यभरात ऑर्किडसाठी अप्रयुक्त बाजारपेठेची क्षमता ओळखून, सुभद्राने तिचे प्रयत्न तीव्र केले.

तिच्या व्यावसायिक मैत्रिणी रीनाच्या मदतीने, तिने तिच्या संग्रहात भर घालण्यासाठी आणि व्यवसाय वाढवण्यासाठी थायलंड आणि तैवानमधून विदेशी ऑर्किड आयात केले. २०१० मध्ये, सुभद्राने अधिकृतपणे तिचा ऑर्किड मार्केटिंग उपक्रम सुरू केला. तिच्या कुटुंबाचा तिला प्रत्येक टप्प्यावर अटळ पाठिंबा महत्त्वाचा होता. अँथुरियम आणि इनडोअर प्लांट्सच्या विक्रीपासून सुरुवात करून, तिच्या मोठ्या ऑर्किड संग्रहातून हा उपक्रम वाढला. नंतर, तिला फलोत्पादन विभागाकडून अनुदान देखील मिळाले कारण ते आले आणि वायनाडमध्ये ऑर्किडची व्याप्ती पडताळून पाहत होते. यामुळे तिला उद्योगाचा विस्तार करण्यास मदत झाली. अलीकडेच, तिने वायनाडमधील अंबलवायल येथील केरळ कृषी विद्यापीठाच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या मदतीने ऑर्किड खरेदी करण्याव्यतिरिक्त वायनाड ऑर्किड शेतकऱ्यांसाठी फलोत्पादन विभागाच्या योजनेचा लाभ घेतला.

आज, निला गार्डनमध्ये तिच्या बागेत अँथुरियम, फर्न, बेगोनिया, आफ्रिकन व्हायलेट, होया आणि इतर घरातील वनस्पतींसह ऑर्किडचा मोठा संग्रह आहे. तिच्या ऑर्किड संग्रहात डेंड्रोबियम (१०० हून अधिक जाती), फॅलेनोप्सिस, मोकारा, ऑन्सीडियम, कॅटलिया, वांडा, सिम्बिडियम, ग्रॅमॅटोफिलम इत्यादींचा समावेश आहे, तसेच स्थानिक ऑर्किडचा चांगला संग्रह आहे.

२०१७ मध्ये, तिचा प्रवास डीडी नॅशनल टेलिव्हिजनवर प्रदर्शित होणाऱ्या लोकप्रिय कृषी दर्शन कार्यक्रमात दाखवण्यात आला होता. ती दर ऑगस्टमध्ये होणाऱ्या बंगळुरू फ्लॉवर शो, कृषी विभागाचा कृषी मेळा (VAIGA), RARS चा पूपोली फ्लॉवर फेस्टिव्हल, कल्पेट्टा फ्लॉवर शो आणि इतर विविध कार्यक्रमांमध्ये तिचा संग्रह प्रदर्शित करते. तिच्या वेबसाइट आणि देशव्यापी प्रदर्शनांद्वारे, सुभद्राचे ग्राहक देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहेत, ज्यामध्ये केरळ आणि बंगळुरू ह्या प्राथमिक बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. तसेच, तिने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रापासून कोलकातापर्यंत खरेदीदारांना विक्री केली आहे. दीर्घकालीन ग्राहक संबंध चांगले राहावेत यासाठी ती चांगल्या प्रकारे काळजी घेत आणि गुणवत्तेसह वनस्पतींचे पॅकेजिंग व्यवस्थापित करते.

सध्या, ती केवळ वनस्पतींच्या विक्रीतून सरासरी मासिक ५०,०००/- रुपये नफा कमावते. व्यावसायिक यशाव्यतिरिक्त, सुभद्रा वनस्पति कौतुक आणि ज्ञान-वाटपाच्या संस्कृतीचे पालनपोषण करण्यासाठी वचनबद्ध आहे. ती तिच्या बागेत येणाऱ्या पाहुण्यांचे मनापासून स्वागत करते आणि फुलांबद्दलची तिची आवड सामायिक करते. ती ऑर्किड लागवडीत रस असलेल्या नवोदित उत्साहींना प्रशिक्षण आणि सल्लागार सेवा देखील प्रदान करते.

ती पुढे म्हणते की, वायनाडमध्ये कापलेल्या फुलांवर प्रक्रिया आणि साठवणूक करण्यासाठी अद्याप पूर्ण सुविधा उपलब्ध नाही. तिला आशा आहे की सरकार कापलेल्या फुलांच्या व्यावसायिक क्षमतेला साकार करण्यासाठी पुढाकार घेईल, विशेषतः बंगळुरूसारख्या मोठ्या बाजारपेठा जवळ असल्याने.

सुभद्राचा दृढनिश्चय आणि वनस्पतींवरील प्रेम हे दर्शवते की कठोर परिश्रम आणि चिकाटीने एखादी व्यक्ती आपली स्वप्ने कशी साकार करू शकते. ती तिची बाग वाढवत असताना, ती तिच्या सर्जनशील कल्पनांनी इतरांना प्रेरित करते. ती भावी पिढ्यांना वय आणि लिंग काहीही असो, त्यांच्या आवडीचा पाठलाग करण्यास प्रेरित करते.

Archana Bhatt
Scientist
Community Agrobiodiversity Centre, MSSRF
Wayanad, Kerala
E-mail: archanabhatt1991@gmail.com

मराठी अनुवाद : लक्ष्मीकांत पडोळे

Source : *Nila garden Passion leading to success, Leisa India, March 2024*

लीसा भारत हे मासिक कृषी विकासाची आवड असणाऱ्या २०००० हून अधिक लोकांपर्यंत पोहचले असून, शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल आहे. दर तिमाहीत, मासिकाच्या मुद्रित आणि डिजिटल आवृत्त्या व्यावहारिक क्षेत्राच्या अनुभवांमध्ये रुची असणारे शेतकरी, स्वयंसेवी संस्था, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी, सरकारी विभाग, बँका इ. पर्यंत पोहोचतात.

दोन दशकांहून अधिक काळापासून निर्मित, लीसा भारत मासिक आपल्या व्यावहारिक आणि दर्जेदार सामग्री, आकर्षक डिझाइन, रंगीबेरंगी मांडणी, सुसंगतता आणि वेळेवर निर्मितीसाठी प्रसिद्ध आहे. इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू, तामिळ, ओडिया, पंजाबी आणि मराठी अशा वेगवेगळ्या ८ भाषामध्ये या मासिकाची निर्मिती केली जाते.

आम्ही संस्था, कंपन्या आणि विद्यापीठांना त्यांच्या सेवा, उत्पादने, अभ्यासक्रम आणि कृषी विज्ञानाच्या तत्वज्ञानाशी संरेखित असलेल्या घटनाच्या कार्यक्रमांची जाहिरात करण्यासाठी आमंत्रित करतो. अधिक माहितीसाठी श्रीमती रुक्मिणी leisaindia@yahoo.co.in वर संपर्क साधा.

